अमरावती पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड

रजि. कार्यालय एम ६२ व ६३, पहिला मजला, कर्नोट प्लेस, नवी दिल्ली -११०००१
संकेतस्थळ : www.rattanindia.com

अमरावती पॉवर ट्रान्समिशन कंपनी लि. साठी दुसऱ्या नियंत्रण कालावधी आर्थिक वर्ष २०११-२०१२ ते २०१५-२०१६ करिता एकाधिक वर्ष शुल्क निर्धारण आणि एकुण महसूल आवश्यकता मंजुरीसाठीची याचिका

**याचिका दाखल :** महाराष्ट्र वीज नियामक आयोग

## १. कार्यकारी सारांश :

- **अ. परिचय :**

  सन्माननीय आयोगाने आदेश दिनांक ३० डिसेंबर २०१० आणि त्याच्या दुरुस्ती आदेश दिनांक ०४ ऑगस्ट २०१४ रोजी अमरावती पॉवर ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड (APTCL) हा एक ट्रान्समिशन परवाना (२०१० च्या परवाना क्रमांक ३) दिला आहे. आयोगाने APTCL ला खालील प्रमाणे स्थापना आणि संबंधित पायाभूत सुविधा निर्मीतीचा आणि संचालनाचा अधिकार दिला आहे.

  - ४०० के व्ही डी / सी क्वॉड मूस अमरावती TPP - Akola II S/S ट्रान्समिशन लाईन (१०४ कि.मि.).
  - ४०० के व्ही लिलो S/C अकोला - कोराडी (७ कि.मि.) ट्रान्समिशन लाईन.
  - MSETCL अकोला - उपकेंद्रामध्ये २ संख्या ४०० के.व्ही लाईन बेज.

- सन्माननीय आयोगाने शासन पत्र क्रमांक एमईआरसी / Capex/ २०११-२०१२ /APTCL/३३४ दिनांक १० मे २०११ परवाना अन्वये उल्लेखीत ट्रान्समिशन लाईन साठी भांडवली खर्च मंजूर केला आहे.

- APTCL ने १७ सप्टेंबर २०११ रोजी आर्थिक वर्ष २०११-२०१२ ते २०१५-२०१६ साठी MYT दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी व्यवसाय योजना सादर केली. सन्माननीय आयोगाने APTCL च्या व्यवसाय योजनेस केस क्रमांक १३५/२०११ नुसार MERC विनियम २०११ च्या तरतुदीनुसार मंजुरी दिली.

- सन्माननीय आयोगाचे निर्देश पालन करुन, APTCL ने व्यवसाय मंजुरीच्या आदेशाप्रमाणे २०१३-२०१४ ते २०१५-२०१६ या आर्थिक वर्षासाठी दुसऱ्या नियंत्रण कालावधी मल्टी वर्ष शुल्क निर्धारण व एकुण महसुल आवश्यकतेसाठी आणि निर्धार मान्यतेसाठी याचिका सादर केली आहे.

- APTCL ने सन्मानीय आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार ४०० के व्ही एस / सी आकोला कोराडी पारेषण वाहीनी, २ क्रमांक ४०० के व्ही लाईन बेज आणि ४०० के व्ही क्वॉड मुस पारेषण वाहीनी कार्यान्वित केली आहेत व क्वॉड लाईन, बेज व एस/सी लिलो वाहिनीकरिताच्या APTCL ने २० मार्च २०१५ पर्यंतचा प्रत्यक्ष खर्च लक्षात घेता भांडवली खर्चासाठी विनंती करत आहे. पुढे APTCL ने प्रारंभीक स्पेअर्सचा अपेक्षीत भांडवली खर्च, आनीबाणी, जिर्नोध्दार प्रणाली आणि निवासी कॉलनी साठी भांडवली तरतुदी केल्या आहेत ज्या १ जानेवारी २०१६ पर्यंत पुस्तकामध्ये भांडवली खर्चात नोंदी करण्याचे आहेत.

- APTCL ने ४०० के व्ही एस/सी अकोला कोराडी लिलो पारेशन वाहीणी २ ऑक्टोंबर २०१२ रोजी कार्यन्वीत केली व नमुद पारेषन वाहीनीचा भांडवली खर्च दिनांक ०३/०६/२०१५ च्या पुस्तकामध्ये नमुद केला आहे. APTCL ने २ नंबर ४०० के व्ही लाईन बेज MSETCL आकोला I उपकेंद्र येथे दिनांक २९ जानेवारी २०१४ व १९ सप्टेंबर २०१४ ला कार्यान्वीत केले आहे. परंतु संबंधीत ४०० के व्ही बेज चे काम ३१ मार्च २०१४ ला पुर्ण झाले होते, म्हणून, सदर भांडवली खर्चाचा आढावा दिनांक १ एप्रिल २०१४ रोजी पुस्तकामध्ये नमुद केला आहे. तसेच APTCL ने ४०० के व्ही डी / सी क्वॉड, मूस पारेषण वाहीनी (१०४ कि.मी.) सर्कीट -I दि.१९ मार्च २०१५ व सर्कीट-II दि. २० मार्च २०१५ ला कार्यान्वीत केले व सदर भांडवली खर्चाचा आढावा दि. २० मार्च २०१५ चा पुस्तकामध्ये प्रस्तावित केला आहे.

**ब. मानलेले भांडवली खर्च :**

- ४०० के व्ही एस / सी अकोला कोराडी पारेषण वाहीनी, MSETCL अकोला येथे २ नंबर ४०० के व्ही लाईन बेज व ४०० के व्ही डी / सी क्वॉड पारेषण वाहीनी यांच्या भांडवली खर्च व सुधारीत पूर्ण भांडवली खर्च खाली दिलेल्या तक्त्यामध्ये नमुद केला आहे.

**तक्ता १ : APTCL च्या सुधारित भांडवली खर्च (रुपये कोटी):**

| अनु. क्रमांक | तपशील | एपिटीसीएल च्या पारेषण प्रणालीच्या तत्वत: मान्यता प्राप्त भांडवली खर्च | MYT याचिकेव्दारे सादर केलेले सुधारित भांडवली खर्च | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | LILO Line | 400 KV Bays | Quad Line | वित्तीय १५-१६ करीता अतिरिक्त भांडवली तरतूद | एकूण |
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 1+2+3+4 |
| **1** | **प्राथमिकता** | | | | | | |
| 1.1 | **परवाना आणि इतर वैधानिक मंजूरी** | 1.00 | 0.00 | 0.00 | 0.58 | 0.00 | 0.58 |
| 1.2 | **सविस्तर मार्ग सर्वेक्षण** | 0.22 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 1.3 | **योग्य मार्गे नुकसान भरपाई** | 5.55 | 0.00 | 0.00 | 1.11 | 0.00 | 1.11 |
| | **उप एकूण (१)** | **6.77** | **0.00** | **0.00** | **1.69** | **0.00** | **1.69** |
| **2** | **पारेषण लाईन** | | | | | | |
| 2.1 | 400 **केव्ही क्वॉड मूस** D/C **अमरावती टिपीपी ते अकोला - II लाईन** | 194.20 | 0.00 | 0.00 | 180.86 | 0.00 | 180.86 |
| 2.2 | 400KV S/C **लिलो लाईन** | | 10.12 | 0.00 | 0.00 | 0.00 | 10.12 |
| | **उप एकूण (2)** | **194.20** | **10.12** | **0.00** | **180.86** | **0.00** | **190.98** |
| **3** | **उप केंद्र** | | | | | | |
| 3.1 | 400 **केव्ही** Bays MSETCL **अकोला**-I **उपकेंद्र** (2 Nos). | 10.00 | 0.00 | 14.39 | 0.00 | 0.00 | 14.39 |
| **4** | **उप-एकूण- I (1+2+3)** | **210.97** | **10.12** | **14.39** | **182.55** | **0.00** | **207.06** |
| 5 | बांधकाम, आस्थापना, व्यवस्थापना, अभियांत्रिकी, स्पेअर्सची, लेखा परिक्षण करणे व खाती आणि देखभाल समावेश खर्च इ. | 12.66 | 0.28 | 0.50 | 6.13 | 4.72 | 11.63 |
| 6 | **संपूर्ण खर्चाची वृध्दी** | 21.10 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 7 | **प्रारंभिक सुटे भाग आणि संसाधने** | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 1.79 | 1.79 |
| 8 | **आकस्मिकता** | 6.33 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 9 | **सल्लागार** | 7.80 | 0.17 | 1.71 | 6.30 | 0.00 | 8.17 |
| 10 | **खेळते भांडवली खर्च** | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| **11** | **उप-एकूण-II (4+5+6+7+8+9+10)** | **258.86** | **10.57** | **16.60** | **194.98** | **6.51** | **228.66** |
| 12 | **वित्तीय आणि बांधकामा दरम्यान व्याज** | 17.10 | 0.00 | 3.26 | 55.22 | 0.00 | 58.48 |
| 13 | **एकूण - अ (DPR खर्च )** | **275.96** | **10.57** | **19.86** | **250.20** | **6.51** | **287.14** |
| 14 | **(ब) ERS खरेदी करीता अतिरिक्त भांडवली खर्च (डीपीआर व्यतिरिक्त खर्च )** | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 9.50 | 9.50 |
| **15** | **एकूण (अ+ब)** | **275.96** | **10.57** | **19.86** | **250.20** | **16.01** | **296.64** |

- **प्रकल्प निधी : APTCL** ने २०११ च्या नियम क्रमांक ३० नुसार निधी : समभाग प्रमाण ७५:२५ इतके कर्ज प्रस्तावित केले. सदर खर्चाचा आढावा खाली दिलेल्या तक्तामध्ये नमुद केलेला आहे.

**तक्ता २ : निधी स्त्रोत (रुपये कोटी)**

| **तपशिल** | **सुधारित कर्ज** | | | |
|---|---|---|---|---|
| | **लिलो लाईन (रुपये कोटी)** | **क्वॉड लाईल (रुपये कोटी)** | **अतिरिक्त भांडवल (रुपये कोटी)** | **एकूण (रुपये कोटी)** |
| **मुख्य किंमत** | **10.57** | **211.58** | **16.1** | **238.16** |
| **वित्तीय व बांधकाम दरम्यान व्याज** | | **58.48** | | **58.48** |
| **बांधकामादरम्यान व्याज** | **10.57** | **270.06** | **16.01** | **296.64** |
| **इक्वीटी** | **2.64** | **67.52** | **4** | **74.16** |
| **कर्ज** | **7.93** | **202.55** | **12.01** | **222.48** |

दिनांक २६ एप्रिल २०१२ च्या सादर केलेल्या व्यवसाय योजने प्रमाणे APTCL ने मानक कर्ज : निधी ७०: ३० प्रमाणे मांडले होते ज्याला सन्माननीय आयोगाने शासन ऑर्डर २०११/१३५ अन्वये मान्यता दिली होती. याचिका कर्ताने भांडवली खर्चाच्या ७५ टक्के कर्ज निधीसाठी विविध सावकार / बँक यांना संपर्क साधला होता. आणि पावर फायनान्स कार्पोरेशन लिमिटेडआणि रुरल ईलेक्ट्रीफिकेशन कार्पोरेशन लिमिटेड यांनी ७५% कर्ज देण्याचे मान्य केले आहे. म्हणून या याचिकेमध्ये APTCL ने कर्ज : निधी चे प्रमाणे ७५: २५ मानले आहे.

**ब.** <u>**दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी एकूण महसूल आवश्यकतेसाठी गणना :**</u>

- APTCL ही नविन ट्रान्समिशन परवाना धारक असल्यामुळे दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी लिलो पारेषण वाहीनीच्या COD पासुन आर्थिक वर्ष २०१३-२०१४ व २०१५-२०१६ साठी एकुण महसुलाची आवश्यकता खालील दिलेल्या तक्त्याप्रमाणे दिली आहे.

**तक्ता ३ :** विविध मालमत्तेसाठी विचारात घेतलेली COD : MYT दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठीचा ARR प्रत्यक्ष भांडवली खर्च प्रत्यक्ष मांडणी खर्चाप्रमाणे अश्या प्रकारे अंदाज आहे.

| पारेषण घटक | COD | व्यावसायीक संचलनाची तारीख | | |
|---|---|---|---|---|
| | | 2013-14 | 2014-15 | 2015-16 |
| लिलो प्रणाली | 03 June, 2013 (प्रत्यक्ष) | आंशिक वर्ष 03.06.13 पासुन 31.03.14 पर्यंत | पूर्ण वर्ष | पूर्ण वर्ष |
| 400 KV Bays at Akola-I S/S | 01 April, 2014 (प्रत्यक्ष) | - | पूर्ण वर्ष | पूर्ण वर्ष |
| Quad transmission line | 20 March, 2015 (प्रत्यक्ष) | - | आंशिक वर्ष 20.03.2015 पासुन 31.03.2015 पर्यंत | पूर्ण वर्ष |
| अतिरिक्त भांडवली खर्च (प्रारंभिक सुट्टे भाग, निवासी कॉलनी, आणिबाणी जिर्नोध्दार प्रणाली) | 1 January, 2016 (अपेक्षित) | - | - | आंशिक वर्ष 01.01.2016 पासुन 31.03.2016 पर्यंत |

- MYT दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठीचा वार्षीक महसुल गरज (ARR) प्रत्यक्ष भांडवली प्रमाणे खर्चाप्रमाणे अश्या प्रकारे आहे. ४०० के व्ही एस / सी आकोला कोराडी पारेषण वाहीनी साठी खर्च १०.५७ कोटी, ४०० के व्ही बेज साठी खर्च १९.८६ कोटी, ४०० के व्ही डी/सी क्वॉड मुज अमरावती TPP अकोला II पारेषण वाहीनी साठी खर्च रु.२५०.२० कोटी झाल्याचा अंदाज आहे. प्रारंभीक सुट्टे भाग, निवासी कॉलनी बांधकाम आणि आणीबाणी जिर्णोद्धार प्रणाली खरेदी खर्च रुपये १६.०१ कोटी, जो दिनांक १ जानेवारी २०१६ पर्यंत करणे अपेक्षीत आहे.
- संचालन व देखभाल खर्च : संचालन आणि देखभाल खर्चाचा अंदाज नविन ट्रान्समिशन परवाना धारक साठी महाविज नियामक आयोग विनीयम २०११ नुसार, प्रति बेज आणि प्रति सर्कीट किलो मिटर प्रमाणे अंदाजीत केला आहे. दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी संचालन व देखभाल खर्च, आर्थिक वर्ष २०१३-२०१४ व २०१५-२०१६ साठी खाली दिलेल्या तक्त्यामध्ये पुरविले जात आहे.

**तक्ता ४ : दुसऱ्या नियंत्रण कालावधीत संचालन व देखभाल खर्च (रुपये कोटी):**

| संचालन व देखभाल खर्च | FY 2013-14 | FY 2014-15 | FY 2015-16 |
|---|---|---|---|
| **संचालन व देखभाल खर्च** | 0.14 | 2.44 | 3.90 |

- **व्दितीय नियंत्रण काळाकरीता घसारा :**

घसारा ढोबळ मुदत मालमत्तेच्या वार्षिक ५.२८ टक्के दराने ही गणना करण्यात आली आहे. आर्थिक वर्ष २०१३-२०१४ व २०१५-२०१६, व्दितीय MYT नियंत्रण कालावधीसाठी घसारा खर्च खालील टेबल मध्ये पुरवले जात आहे.

**तक्ता ५ : दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी घसारा (रुपये कोटी):**

| घसारा | FY 2013-14 | FY 2014-15 | FY 2015-16 |
|---|---|---|---|
| ढोबळ स्थायी मालमत्ता (प्रारंभिक शिल्लक) | - | 10.57 | 280.63 |
| ढोबळ स्थायी मालमत्ता (समावेश) | 10.57 | 270.07 | 16.01 |
| ढोबळ स्थायी मालमत्ता (अखेरची शिल्लक) | 10.57 | 280.63 | 296.64 |
| **घसारा खर्च** | **0.46** | **2.04** | **15.03** |

आर्थिक वर्ष २०१३-२०१४ व २०१५-२०१६ दुसऱ्या MYT नियंत्रण कालावधीचा दिर्घकालीन कर्जावरील व्याज संबंधीत माहिती खालील तक्त्या मध्ये पुरवली जात आहे.

**तक्ता ६ : दुसऱ्या नियंत्रण काळात व्याज खर्च (रुपये कोटी) :**

| व्याज खर्च | FY 2013-14 | FY 2014-15 | FY 2015-16 |
|---|---|---|---|
| प्रारंभिक शिल्लक कर्ज | - | 7.47 | 207.98 |
| समावेश | 7.93 | 202.56 | 12.01 |
| परतफेड | 0.46 | 2.04 | 15.03 |
| अखेरचे शिल्लक कर्ज | 7.47 | 207.98 | 204.96 |
| **व्याज खर्च** | 0.86 | 3.81 | 26.45 |

- **खेळते भांडवलीवरील व्याज :** खेळते भांडवल ३५.२ (ब) आयोग विनियम २०११ या मानकाआधारे १४.६०% मोजले गेले आहे, जी याचिका सादर केलेल्या तारखेला एसबीआय स्टेट बँक ऑफ अॅडव्हान्स रेट (SBAR) समान असणाऱ्या व्याज दराबरोबर आहे. व्दितीय MYT नियंत्रण कालावधीकरीता आर्थिक वर्ष २०१३-२०१४ व २०१५-२०१६ खेळते भांडवलावरील व्याज संबंधीत माहिती खालील तक्त्या मध्ये पुरविली जात आहे.

**तक्ता ७: दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी काम भांडवलावर व्याज रुपये कोटी :**

| खेळते भांडवल | FY 2013-14 | FY 2014-15 | FY 2015-16 |
|---|---|---|---|
| संचालन व देखभाल खर्चाचे एक महिना समतुल्य | 0.01 | 0.20 | 0.32 |
| भांडार, सामुग्री आणि पुरवठा यांची पुस्तक मुल्याचा १/१२ अंश | 0.01 | 0.23 | 0.25 |
| प्रचलित दराने पारेषण शुल्काचे दीड महिन्याचा अपेक्षित महसुल | 0.28 | 10.18 | 7.53 |
| संपूर्ण खेळत्या भांडवलाची गरज | 0.30 | 10.61 | 8.10 |
| **खेळत्या भांडवलावरील व्याज @ १४.६०%** | **0.03** | **0.23** | **1.17** |

- **आकस्मिक राखीव अंशदान :**

आकस्मिक साठा योगदान एमईआरसी (MYT) विनियम, २०११ आर्थिक वर्ष २०१३-२०१४ पासून ते आर्थिक वर्ष २०१५-२०१६ पर्यंत २ MYT नियंत्रण कालावधीसाठी आकस्मिक राखीव अंशदान नियमन ६१,१० नुसार GFA उघडण्याच्या ०.२५% दराने ही गणना करण्यात आली आहे व खालील तक्ता प्रमाणे आहे.

**तक्ता ८ : दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी आकस्मिक साठा योगदान (रुपये कोटी) :**

| तपशिल | FY 2013-14 | FY 2014-15 | FY 2015-16 |
|---|---|---|---|
| **आस्कमित राखीव** | 0.03 | 0.70 | 0.74 |

- **डक्विटी परतावा :**

APTCL ने एमईआरसी (MYT) विनियम, २०११ नुसार आर्थिक वर्ष २०१३-२०१४ पासून ते आर्थिक वर्ष २०१५-२०१६ दुसऱ्या करिता MYT नियंत्रण कालावधीसाठी इक्विटी परतावा अंदाजित केला आहे. वर्षाला १५.५०% दराने इक्विटी परतावा अंदाज खालील तक्तामध्ये व्यक्त केला आहे.

**तक्ता ९ : दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी इक्विटी वर परत (रुपये कोटी)**

| तपशिल | FY 2013-14 | FY 2014-15 | FY 2015-16 |
|---|---|---|---|
| इक्वीटी प्रारंभिक शिल्लक | - | 2.64 | 70.16 |
| भांडवली गुंतवणुकीमध्ये इक्वीटीचा समावेश | 2.64 | 67.52 | 4.00 |
| इक्वीटीची अखेरची शिल्लक | 2.64 | 70.16 | 74.16 |
| **इक्वीटी परतावा @ १५.५%** | **0.34** | **1.50** | **11.03** |

- **आयकर खर्च :**

आयकर वार्षिक महसूल खर्च, लागू असलेल्या MAT ला विचारात घेवून २०.९६% दराने वार्षिक महसूल गरजेमध्ये समावेशीत केला आहे.

**तक्ता १० : दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी आयकर खर्च (रुपये कोटी) :**

| आयकर | FY 2013-14 | FY 2014-15 | FY 2015-16 |
|---|---|---|---|
| आयकर | 0.09 | 0.40 | 2.92 |

- **शुल्क रहित उत्पन्न :** APTCL ने आस्कमित साठ्यातून केलेल्या गुंतवणुकीवर ८.०० % व्याज दर आणि इतर गुंतवणूकीवर व्याज आधारित करून शुल्क रहित उत्पनाची गणना करण्यात आली आहे.

**तक्ता ११: दुसऱ्या नियंत्रण कालावधीसाठी नि:शुल्क उत्पन्न (रुपये कोटी) :**

| तपशिल | FY 2013-14 | FY 2014-15 | FY 2015-16 |
|---|---|---|---|
| Non-tariff Income | 0.11 | 0.22 | 0.03 |

दुसऱ्या नियंत्रण कालावधी आर्थिक वर्ष २०१३-२०१४ व २०१५-२०१६ साठी APTCL साठी एकुण महसुल गरजेचा खालील तक्त्यामध्ये सारांश आहे.

**तक्ता १२: (रु. कोटी) दुसऱ्या नियंत्रण कालावधी एकूण महसूल आवश्यकता व सारांश (रुपये कोटी) :**

| क्रमांक | तपशील | वित्तीय वर्ष 2013-14 | वित्तीय वर्ष 2014-15 | वित्तीय वर्ष 2015-16 |
|---|---|---|---|---|
| 1 | ऑपरेशन व देखभाल खर्च | 0.14 | 2.44 | 3.90 |
| 2 | घसारा | 0.46 | 2.04 | 15.03 |
| 3 | दीर्घकालीन कर्ज व्याज | 0.86 | 3.81 | 26.45 |
| 4 | खेळते भांडवली व्याज | 0.03 | 0.23 | 1.17 |
| 5 | इतर खर्च | - | - | - |
| 6 | आकस्मिक राखीव योगदान | 0.03 | 0.70 | 0.74 |
| 7 | आयकर खर्च | 0.09 | 0.40 | 2.92 |
| **8** | एकूण महसुली खर्च | **1.61** | **9.62** | **50.22** |
| 9 | इक्विटी कॅपिटल वर परत | 0.34 | 1.50 | 11.03 |
| **10** | एकूण आवश्यक महसूल | **1.95** | **11.12** | **61.25** |
| 11 | कमी :- इतर उत्पन्न | 0.11 | 0.22 | 0.03 |
| 12 | कमी : - इतर व्यवसाय उत्पन्न | - | - | - |
| **13** | पारेषण दरापासून एकूण आवश्यक महसूल | **1.84** | **10.90** | **61.21** |

- **पार पाडण्यासाठी खर्च :** APTCL ने पुढे सादर केले आहे की लिलो लाईन दिनांक ३ जुन २०१३ रोजी, अकोला -I येथील २ क्रमांक बेज दिनांक १ एप्रिल २०१४ रोजी आणि क्वॉड लाईन अलिकडे दिनांक २० मार्च २०१५ ला कार्यान्वीत केली आहेत. परंतु ARR ची वसुली याचिका ही मंजुर करण्यात आल्यानंतरच मंजुर केलेला वार्षिक महसुल गरज आंतरराज्य MYT आदेशामध्ये समावेशित केला जाईल. त्यामुळे APTCL ने मा. आयोगास विलंब खर्च भरुन वार्षिक महसुल गरज पुर्नप्राप्ती परवानगी देण्यासाठी विनंती केली आहे. APTCL ने आर्थिक वर्ष २०१३-२०१४, २०१४-२०१५ या कालावधीसाठी आणि पार पाडण्यासाठीचा खर्च आर्थिक वर्ष २०१५-२०१६ मधील सदरचा पार पाडण्यासाठीचा खर्च विलंब अंदाजित करून जो याचिका दाखल केल्यानंतरच्या कार्यवाहीच्या काळात जो ४ महिने अंदाजित प्रमाणे आहे. APTCL ने वार्षिक महसुल पुर्नप्राप्ती ऑगस्ट २०१५ पासून मानने आहे, पार पाडण्यासाठीचा खर्चेची गणना APTCL ने केलेल्या गणनेनुसार रुपये ६.९९ कोटी येतो.
- **कामगिरी मानके** : APTCL ने कामगिरी मानके पालन करण्यासाठीची बांधिलकी सादर केली आहे व ज्यासाठी एक आराखडा प्रस्तावित केला आहे.
- **निर्देश अनुपालन** : सन्माननीय आयोगाने, केस क्रमांक १३५/२०११, २६ एप्रिल २०१२ च्या आदेशामध्ये पूर्ण भांडवली खर्च, बांधकाम जोखीम व ऑपरेशन जोखीम, क्षमता Offtake जोखीम, विज निर्मिती प्रकल्पामधील विलंबामुळे येणारी भांडवली खर्चावरील परिणाम, पारेषण व्यवसायाचा जोखिम प्रोफाईल व दिर्घ कालीन कर्जावरील व्याज यासंबंधित काही निरीक्षणे केली होती. याचिकाकर्ताने या विषयांवर प्रत्येक बिंदू कुशल सबमिशन केले आहे आणि त्यातील प्रत्येक गाष्टीचे पालन करण्याचा प्रयत्न केला आहे.